दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
वर्ष-४
अंक - ३८
epaper.diwanews.com
www.diwanews.com ♦ सोमवार,२१ एप्रिल २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किंमत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

**काळू धरणासाठी जमिन संपादनाला गती द्यावी**

पुनर्वसनाचा आराखडा तातडीने तयार करावा

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश



## उन्हाचा वाढता पारा,पायी चालणारे नागरिक हवालदिल

# दिव्यातील मुख्य रस्त्यांच्या दुतर्फा झाडेच नाहीत

## पालिकेने दिव्यात झाडे लावण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याची गरज

**नागरिकांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून ठाण्यात सिग्नलवर हरित आच्छादने लावण्यात आली आहेत, मात्र दिव्यासारखा शहरात मुख्य रस्त्यांना दुतर्फात झाडेच लावली नसल्याने पायी चालणाऱ्या नागरिकांना उन्हाचा प्रचंड त्रास होत आहे.**

■ **विशेष प्रतिनिधी**

ठाणे: उन्हापासून बचाव होण्यासाठी सध्या ठाणे शहरात मोठ्या सिग्नलपाशी हरित आच्छादने उभारण्यात आली आहेत. हा उपक्रम नागरिकांच्या दृष्टीने दिलासा देणारा आहे मात्र दुसरीकडे ठाणे महापालिका हद्दीत असणऱ्या दिवा शहरात मात्र मुख्य रस्त्यांना दुतर्फात झाडेच लावली गेली नसल्याने येथील नागरिकांना वाढत असलेल्या उन्हाचा त्रास होत आहे.

दिव्यात सिग्नल यंत्रणा अस्तित्वात नसली तरी ज्या ठिकाणी वाहतूक कोंडी होते अशा ठिकाणी ठाणे शहराप्रमाणेच तात्पुरत्या स्वरूपात हरित अच्छादने दिवा शहरात ही लावायला हवी,अशी मागणी सुजाण नागरिक करताना दिसत आहेत.

दिवा शहरात तीन मुख्य रस्ते आहेत. दिवा शील रोड, दिवा आगासन रोड आणि दिवा स्टेशन ते दातिवली रोड या तीनही रस्त्यांना दुतर्फा झाडे लावली गेली नसल्याने पायी चालणऱ्या नागरिकांना उन्हाचा त्रास होत असल्याचे वाढत्या उन्हामध्ये प्रकर्षाने जाणवत आहे. रस्त्यांच्या बाजूला झाडांची वानवा आहे. तेवढी वानवा सोडवा आणि रस्त्यांच्या बाजूला झाडे लावा. अशी मागणी दिवेकर नागरिकांकडून यानिमित्ताने केली जात आहे.

*दिवा शहरात वृक्ष लागवड झाली पाहिजे ही मागणी गेली दहा-बारा वर्ष मी सातत्याने करत आहे.दक्ष चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून प्रत्येक पावसाळ्यात झाडे लावण्याचे आवाहन मी करत असतो.आम्ही प्रत्यक्षात कृती करतो.मात्र महापालिकेच्या अखत्यारीत असणाऱ्या दिव्यातील मुख्य रस्त्यांना महापालिकेने स्वतःहून पुढाकार घेऊन या पावसाळ्यात वृक्षारोपण करावे. दिव्यातील मुख्य रस्त्यांना हरित करावे,याचा फायदा शहरातील नागरिकांना होईल. आयुक्तांनी या विषयात लक्ष घालावे अशी माझी मागणी आहे. दिवा शहरात असणाऱ्या रस्त्यांना झाडांची संख्या तुरलक आहे.मुख्य रस्त्यांना झाडेच नाहीत. महापालिका प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे.*

**-राजकांत पाटील**, सामाजिक कार्यकर्ते





**दिवा न्यूज विशेष**

झाडे लावा झाडे जगवा हा संदेश दरवर्षी दिला जातो.तसेच लाखो झाडे लावली जातात. परंतु दिवा शहरात या संदेशाचा बहुदा महापालिका प्रशासनाला विसर पडला आहे. त्यामुळे यावर्षी तरी पावसाळ्यात झाडे लावून शहराच्या सौंदर्यात भर घालावी असाही सूर उमटत आहे. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली गेल्यास दिवेकर नागरिकांही येता-जाता तरी किमान सावलीचा सहवास लाभेल. शिवाय समस्यांच्या एका अंधारातून दिव्याची सुटका होईल असेही बोलले जात आहे.

देशाच्या नकाशावर दिवा रेल्वे स्थानकाची जंक्शन अशी ओळख आहे. याच दिवा स्टेशन -आगासन रोड- आगासन फाटक या प्रमुख रस्त्याला महापालिकेमार्फत रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्यात आलेली नाहीत. मुख्य रहदारीचा रस्ता असणऱ्या या भागात कमी उंचीची झाडे का लावण्यात आली नाहीत हा मोठा प्रश्न आहे. रस्त्याने चालणाऱ्या पादचाऱ्यांना प्रचंड उन्हाचा सामना करावा लागतो. तशीच काहीशी परिस्थिती दिवा स्टेशन ते खर्डी ब्रिज दरम्यानच्या रस्त्याला आहे. तर दिवा स्टेशन मुंब्रा देवी कॉलनी दातिवली रोड या रस्त्याला सुद्धा महापालिकेमार्फत रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्यात आलेले नाहीत. दिवा आगासन रोड आणि दिवा स्टेशन,मुंब्रा देवी कॉलनी दातिवली रोड हे रस्ते बनवून काही वर्षाहून अधिक काळ झाला.मात्र शहरातील मुख्य रहदारीच्या रस्त्यांना सावली असावी व शहरात झाडांची संख्या अधिक असावी या उद्देशाने कोणतीही पावले महापालिका किंवा वृक्ष प्राधिकरण उचलताना दिसत नाही. अलीकडे वाढलेल्या उन्हाळ्यात या दोन्ही रस्त्यांना नसलेली झाडे यामुळे नागरिकांना उन्हामुळे होत असलेला त्रास अधिक जाणू लागल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे.

**झाडे लावा झाडे जगवा हा संदेश दिव्यासाठी नाही का?**

झाडे लावा झाडे जगवा हा संदेश दरवर्षी दिली जातो. तसेच दरवर्षी झाडे लावली जातात, मात्र ही झाडे मुख्य शहरांमध्ये प्रामुख्याने लावली जातात. दिवा हे शहर महापालिका हद्दीत आहे याचा बहुतेक महापालिका प्रशासनाला विसर पडला असावा. या शहरातही तीन मुख्य रस्ते आहेत. मात्र ते प्रशासनाला दिसत नसल्याने झाडे लावली जात नाहीत का असा सवाल नागरिक विचारत आहेत.

**तुम्ही तरी झाडे लावण्यासाठी पुढाकार घ्या...**

ठाणे महापालिका क्षेत्रात जिथे ६० सेकंदांपेक्षा जास्त वेळेचा सिग्नल आहे, अशा ठिकाणी हरित आच्छादनांची व्यवस्था करावी, असेही निर्देश आयुक्त राव यांनी दिले आहेत. मात्र दिवा शहरात एक ही सिग्नल नसल्याने शहराप्रमाणे आच्छादने उभारणार नाही का? दिवेकर नागरिक ही करदाते आहेत. या वर्षी दिवा या शहरातील जे मुख्य रस्ते आहेत. त्या रस्त्यांच्या बाजूला आयुक्तांनी पुढाकार घेऊन झाडे लावावीत.म्हणजे भविष्यात त्या झाडांच्या खालून जाताना उन्हाची दाहकता कमी लागेल अशी माफक पेक्षा दिवेकर नागरिकांनी व्यक्त केली आहे.



# महागाईविरोधात राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे आंदोलन

**ठाणे:-** गेल्या काही दिवसांपासून सर्वच जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढू लागले आहेत. तेल, धान्य, कडधान्य, घरगुती गॅस, इंधन यांचे दर गगनाला भिडत आहेत. मात्र, त्याचे कोणतेही सोयरसुतक सरकारला नाही, असा आरोप करीत राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शुक्रवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हे आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी सरकारविरोधात , गाड्या घ्या..! सायकली द्या; महागाई कशासाठी..! गद्दारांच्या सोयीसाठी; ५० खोके महागाई महागाई कशासाठी, आमदारांच्या खरेदीसाठी; बहुत हो गयी महंगाई की मार, चलो हटाये मोदी सरकार; सरकार खाते पेट्रोल वर दलाली.. डायन झाली महागाई; भ्रष्ट झाले सरकार.. म्हणून झाला महागाईचा हा हा कार , अशा घोषणा दिल्या. राष्ट्रीय सरचिटणीस डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या आदेशानुसार ?ताताई आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली शहराध्यक्ष सुहास देसाई, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, महिलाध्यक्षा सुजाताताई घाग, युवक अध्यक्ष विक्रम खामकर, प्रदेश प्रवक्त्या रचना वैद्य यांच्या उपस्थितीत हे आंदोलन करण्यात आले.

यावेळी पत्रकारांशी बोलताना ?ताताई आव्हाड यांनी, इथे दुचाकी आडवी पाडून आंदोलन करण्यात आले आहे. मात्र, या देशाची अर्थव्यवस्थाच धारातीर्थ पडली आहे. आपल्या देशातील महागाई कमी करण्याचे कोणतेही धोरण आखले जात नाही. आता महागाई कमी करण्यासाठी जनतेने काय करावे, हे तरी सरकारने सांगायला हवेय. आपल्या देशाने अमेरिकेच्या टेरिफ धोरणावर कोणतीही भूमिका घेतलेली नाही. आपले नेतृत्व अमेरिकेला घाबरते की काय, हे माहित नाही. मात्र, हे सरकार भूमिकाच घेत नसल्याचे दिसून येत आहे. सरकारच्या नाकर्तेपणामुळे या देशातील अल्पभूधारक शेतकरी मृत्युपंथाला लागले आहेत. त्याचे कोणतेही सोयरसुतक या सरकारला नाही, असे सांगितले.



दुचाकी आडवी पाडून जोरदार निदर्शने

या आंदोलनात मर्जिया पठाण, प्रभाकर सिंग, सुरेंद्र उपाध्याय, ॲड. कैलास हावळे, गजानन चौधरी,राजु चापले, प्रफुल कांबळे, जतीन कोठारे, उमेश अग्रवाल, राजेश कदम, संतोष नागले, माधुरी सोनार, राजेश ज. साटम, शशिकला पुजारी, कमर जान मुलानी, पुजा खान, संतोष तिवारी, शुभम द्विवेदी, संतोष साटम, दिलीप लोखंडे, राहुल ठाणेकर, कैलास सुरकर, प्रविण सिंह, एकनाथ जाधव, समीर नेटके, विशांत गायकवाड, इक्बाल शेख, शिवा कालूसिंह, मंगेश गायकवाड, मेहरबानो पटेल , ज्योती निम्बर्गी , मीना ओव्हळ, वंदना लांडगे , शुभांगी कोळपकर, रेश्मा भानुषाली, लता ताई ढाकर , सुजाता कदम , मल्लिका पिल्ले , मनीषा पटेल, बेबीका नंदा, हिराबाई गोहिल, मंजुबाई गोहिल, सुचिता पवार प्रीती सुळे, जयश्री अहिरे , ताराबाई इस्ले, मेघा गवते , सोनाली कदम , संगीता लोकरे , मनीषा पाटील, मीना माने , स्नेहल चव्हाण, अजित मोरे, केतन जेधे, महेश भाग्यवंत, हिरु गंगावाशी, धर्मेंद्र अस्थाना, पद्माकर पाटील, समाधान माने, राहुल भालेराव, शेखर भालेराव, वैभव खोत, वसीम खान, हरिवंश चव्हाण, विक्रम सिंह, किरण पवार, दिगंबर गरुड, आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# घरगुती गॅस दरवाढी विरुद्ध दिव्यात शिवसेनेचे आंदोलन

## रस्त्यावर चूल पेटवून भाकरी थापत नोंदवला निषेध

**ठाणे:-** गेल्या आठवड्यात घरगुती सिलेंडरची किंमत ५० रुपयांनी वाढल्याने गृहिणींचे आर्थिक गणित कोलमडले आहे. यातच आजपासून घरगुती पीएनजी आणि वाहनांच्या सीएनजी गॅसची दरवाढ झाल्याने भाजप सरकार विरोधात मंगळवारी संतापाचा उद्रेक झाला. दिव्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आंदोलन केले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी रस्त्यावरच चूल पेटवत भाकरी थापली. तसेच शेणाच्या गौऱ्या आणि लाकडाची फाट्यांद्वारे या भाजप सरकारचा निषेध नोंदवला.

मुंबईसह उपनगरात आज पासून सीएनजी दीड रुपयाने तर पीएनजी म्हणजे घरगुती पाईप गॅस एक रुपयाने महागला आहे त्यामुळे आता सीएनजी ७९.५० रुपये प्रति किलो तर पाईप गॅस प्रति युनिट ४९ रुपये झाला आहे घरगुती गॅस साठीचा खर्च वाढला असून डॉलरच्या तुलनेत रुपयाचा भाव वधारल्यामुळे गॅसच्या किमती वाढवावे लागल्याचे एमजीएलच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. हेच का मोदीचे अच्छे दिन असा सवाल विचारत दिव्यात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून महिलांनी चुलीवर ती जेवण बनवून भाजप सरकारचा निषेध केला सिलेंडरच्या सबसिडीच्या नावाखाली हे सरकार लोकांची फसवणूक करत आहेत देशात उज्वला योजना राबवून मोदींनी मन की बात मध्ये म्हटले होते की महिलांचे धुराचे अश्रू मला पहावत नाहीत म्हणून उज्वला योजना राबवण्यात आली परंतु आज याच सिलेंडरचे भाव गगनाला भिडलेले असून सामान्य महिलांचे हाल होत आहेत व पुन्हा चुलीवरती जेवण बनवण्याची परिस्थिती देशात मोदी सरकार करत आहे.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे दिवा शहराच्या वतीने गॅस दरवाढी विरुद्ध निषेध आंदोलन करण्यात आले या आंदोलनाचे नेतृत्व दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे, दिवा महिला शहर संघटिका ज्योती पाटील, विभाग संघटिका मयुरी पोरजी यांनी केले. याप्रसंगी उपशहर प्रमुख तेजस पोरजी, उपशहर संघटक प्रवीण उतेकर, विभाग प्रमुख नागेश पवार ,संजय जाधव, रवी रसाळ, शनिदास पाटील ,उपविभाग प्रमुख अजित माने, शाखाप्रमुख राजेश गुप्ता, नितीन काळे, विजय कदम, विभाग संघटिका सुवासिनी गुडेकर, उप संघटिका आशा इंगोले ,शाखा संघटिका संगीता मचाडो, स्वाती चव्हाण आधी कार्यकर्ते उपस्थित होते .

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

## ठाणे जिल्ह्याचा पाणी प्रश्न निकाली काढण्यासाठी काळू धरण महत्वपूर्ण

# काळू धरणासाठी जमिन संपादनाला गती द्यावी,पुनर्वसनाचा आराखडा तातडीने तयार करावा

**मुंबई :** ठाणेसह, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापुर, भिवंडी, भिवंडी ग्रामीण याभागातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी महत्वपूर्ण असलेले काळू धरण कालमर्यादेत पूर्ण करण्यात यावे. त्यासाठी संबंधित प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयातून भूसंपादन, पुर्नवसन कामांना गती द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे दिले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

मंत्रालयात यासंदर्भात झालेल्या बैठकीस जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, जलसंपदा विभागाचे प्रकल्प समन्वयक सचिव संजय बेलसरे, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जलसंपदा विभागाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले आदी अधिकारी यावेळी उपस्थित होते. पालघर जिल्हाधिकारी आणि ठाणे, पालघर जिल्ह्याचे वन विभागाचे अधिकारी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

मुंबई महानगर क्षेत्रातील शहरांमधील पाणी प्रश्न निकाली काढण्यासाठी काळू धरण प्रकल्प महत्वाचा आहे. ब्रयाच वर्षापासून प्रकल्प मंजूर असून खासगी भूसंपादन, वन जमीन भूसंपादन, पुर्नवसन ही कामे तातडीने प्रशासकीय यंत्रणांनी पूर्ण करणे गरजेचे असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. काळू प्रकल्पाकरीता बाधित होणऱ्या वन जमिनींच्या मोबदल्यात पर्यायी वनीकरण करण्यासाठी पालघर जिल्ह्यात उपलब्ध जमिनीची माहिती पालघर जिल्हाधिकाऱ्यांनी सोमवारपर्यंत कळविण्याचे निर्देश यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

ठाणे जिल्हाधिकारी यांनी जमीन संपादनासाठीच्या प्रशासकीय बाबींसाठी विविध यंत्रणांमध्ये समन्वयाचे काम करावे. या प्रकल्पामुळे जी गावे बाधित होणार आहेत त्यांचा पुर्नवसन आराखडा तातडीने तयार करून भूसंपादनाला गती देण्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, भिवंडी, भिवंडी ग्रामीण याभागातील पाणी निकाली काढण्यासाठी हा प्रकल्प महत्वाचा असल्याने त्याला कालमर्यादेत पूर्ण करण्याचे आवाहनही उपमुख्यमंत्र्यांनी केले.

## गहाळ झालेले ३५ मोबाईल फोन परत तक्रारदारांच्या हाती ; वर्तकनगर पोलिसांची कामगिरी

ठाणेः वर्तकनगर परिसरात गहाळ झालेले तब्बल साडे दहा लाखांचे एकूण वेगवेगळ्या कंपनीचे ३५ मोबाईल फोन शोधून ते तक्रारदारांना परत करण्यात यश आले आहे. हे मोबाईल फोन ठाणे, मुंबई, तसेच गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली, आसाम, तामिळनाडु, आणि इतर राज्यातून शोधून शनिवारी १९ एप्रिल रोजी २०२५ रोजी सहायक पोलीस आयुक्त मंदार जावळे यांच्या हस्ते परत करण्यात आले.

वर्तक नगर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात दररोज गहाळ होणारे मोबाईल बाबत तक्रारी प्राप्त होतात. त्यानुसार पोलीस ठाण्यात प्रॉपर्टी मिसींग अशी नोंद केली जाते. मागील काही दिवसात हे प्रमाण वाढल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमार वाघवचरे यांच्या मार्गदर्शनाखाली २० फेब्रुवारी २०२५ रोजी पासूनचे मोबाईल फोन गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल जे. चिंतामण व पोलीस शिपाई नानासाहेब नागरे यांनी र्ण्ईं पोर्टलवर तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे त्यांची माहिती मिळवून जास्तीत जास्त मोबाईलचा शोध घेतला. त्यातील एकूण १० लाख ५० हजार रूपये किंमतीचे वेगवेगळ्या कंपनीचे तब्बल ३५ मोबाईल फोन तक्रारदार नागरीकांना सुपूर्द करण्यात आले.

## वेश्यागमन प्रकरणी दलाल महिला अटकेत; तिघींची सुटका

ठाणेः असहाय्य महिलांना फुस लावुन वेश्यागमन करण्यास भाग पडणऱ्या एका दलाल महिलेला ठाणे शहर पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध पथकाने अटक केली. तसेच त्या महिला दलालाच्या तावडीतून तिघींची सुटका करण्यात त्या पथकाला यश आले आहे.

ठाणे स्टेशन रोडवरील एका हॉटेल्स या ठिकाणी एक दलाल महिलेने काही पिडीत व असहाय्य महिलांना फुस लावुन वेश्यागमनासाठी बोलावले आहे. अशी माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांना माहिती मिळाली. त्यानुसार सापळा लावून त्या दलाल महिलेला अटक केली.

## ठाणे पोलीस आयुक्तालयात अभ्यागत व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित;येणाऱ्या प्रत्येकाची यापुढे होणार नोंद

**ठाणेः** ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या मुख्य कार्यालयामध्ये अनेक नागरिक विविध प्रकारच्या तक्रारी, निवेदने, अर्ज घेऊन पोलीस आयुक्त कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटावयास येत असतात. सध्या त्यांची नोंद साध्या रजिस्टरमध्ये घेतली जात होती. तथापि, यातून भेटी देणऱ्या नागरिकांबाबत सविस्तर माहिती मिळत नव्हती. यात एकसुत्रीपणा यावा म्हणून संगणक आधारित अभ्यागत व्यवस्थापन प्रणाली (त्रेगूदे ईंईसहू एेबुस) ठाणे शहर पोलीस आयुक्त कार्यालयाच्या स्वागत कक्ष या ठिकाणी मंगळवारीपासून ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या संकल्पनेतून कार्यान्वित करण्यात आली आहे.



या प्रणालीचे औपचारिक उद्घाटन पोलीस सह आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त (पश्चिम प्रादेशिक विभाग) विनायक देशमुख, अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) श्रीकांत पाठक, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय १) डॉ. श्रीकांत परोपकारी, पोलीस उप आयुक्त (आर्थिक गुन्हे शाखा) पराग मणेरे, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२) शशिकांत बोराटे, तसेच पोलीस उप आयुक्त (विशेष शाखा) मीना मकवाणा यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

**भेटीनंतर त्यांना अभिप्राय घेतला जाईल...**

या प्रणालीव्दारे अभ्यागतांना त्यांचा मोबाईल फोन नंबर, पत्ता, संबंधित पोलीस ठाणे तसेच कोणत्या अधिकाऱ्यांना भेटावयाचे आहे इत्यादी माहिती संगणकामध्ये भरावी लागेल. तसेच ज्या अधिकाऱ्यांना भेटावयाचे आहे, त्यांचे स्वीय सहाय्यक / वाचक यांना लगेचच मोबाईल फोनव्दारे नोटीफिकेशन जाणार आहे. तसेच संबंधित नागरिकांच्या भेटीनंतर त्यांना अभिप्राय देण्याची सुविधा देखील या प्रणालीमध्ये उपलब्ध आहे.

**यामुळे जास्तीत जास्त पारदर्शकता येईल.....**

या प्रणालीव्दारे नागरिकांच्या भेटींबाबत साप्ताहिक अहवाल, मासिक अहवाल इत्यादी व्दारे विश्लेषण करणे शक्य होणार आहे. तसेच जास्तीत जास्त पारदर्शकता, नागरिकांना त्वरीत सेवा इत्यादी फायदा या तंत्रज्ञानाव्दारे होणार आहे.

# केंद्र सरकार व ईडी विरोधात ठाण्यात काँग्रेसचे आंदोलन



**ठाणे**:- मोदी सरकारने केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करत द्वेषपूर्ण भावनेतून व सूडबुद्धीने ' नॅशनल हेरॉल्ड ' या वृत्तपत्राची मालमत्ता जप्ती साठी सुरू असलेली कारवाई तसेच काँग्रेसच्या नेत्या खासदार सोनिया गांधी, लोकसभेचे विरोधी पक्ष नेते तथा खासदार राहुल गांधीं, अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह इतर जेष्ठ नेते मंडळींवर सत्तेचा दुरुपयोग करून चार्जशीट दाखल करण्याचा निर्णय घेतला. त्याच्याविरोधात काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये संतापाचे वातावरण असून देशभरातील ईडी कार्यालयाबाहेर आंदोलने केली जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून या निर्णया विरोधात ठाण्यातील कोर्ट नाक्यावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या वतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी मोदी सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली.या प्रसंगी बोलताना अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव, कोकण सहप्रभारी, यु बी व्यंकटेश म्हणाले की, नॅशनल हेराल्ड प्रकरणात कोणताही घोटाळा झालेला नाही. ही एक राजकीय दृष्टीने प्रेरित कारवाई आहे. एका षडयंत्राचा भाग म्हणून गांधी कुटुंबाला लक्ष केले जात आहे. सत्य आणि न्यायाच्या बळावर आम्ही या लढ्याला सामोरे जाऊ. यावेळी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्या सूचनेनुसार ठाण्यात कोकण सहप्रभारी यु बी व्यंकटेश यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या आंदोलनात ठाणे काँग्रेस अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांच्यासह माजी खासदार कुमार केतकर, प्रदेश महिला काँग्रेस अध्यक्ष संध्याताई सव्वालाखे, प्रदेश पदाधिकारी चंद्रकांत पाटील, संतोष केणे, ठाणे ग्रामीण अध्यक्ष दयानंद चोरघे, कल्याण शहर अध्यक्ष सचिन पोटे, उल्हासनगरचे अध्यक्ष रोहित साळवे, भिवंडी काँग्रेसचे अध्यक्ष अब्दुल रशीद ताहीर मोमीन , ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांच्यासह संपूर्ण जिल्ह्यातील विविध फ्रंटल व सेलसह सर्व स्तरातील काँग्रेस पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

# घरफोडी करणारी अट्टल दुकली जेरबंद तीन घरफोडीचे गुन्हे उघडकीस

## सात लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात यश

**ठाणे**:- कळव्यातील घरफोडीच्या गुन्ह्यांचा तपास करताना, ठाणे गुन्हे शाखेने मुंब्रा, खर्डी गाव रोड येथील युसुफ नुरइस्लाम शेख (२८) आणि मुंब्रा, ठाकूर पाड्यातील मारूक नासीर शेख (३०) या अट्टल घरफोडी करणाऱ्या चोरट्यांना मोठ्या शिताफीने अटक केली. तसेच चौकशीत त्या दोघांनी तीन गुन्ह्यांची कबुली दिल्याने ते गुन्हे उघडकीस आले असून त्या गुन्ह्यातील ऐवजासह गुन्ह्यात वापरलेली रिक्षा असा ७ लाखांचा मुद्देमाल त्यांच्याकडून पोलिसांनी हस्तगत केला आहे. युसूफ याच्यावर ठाणे आणि मुंबईत प्रत्येकी तीन गुन्हे दाखल आहेत. तसेच मारूक याच्यावर नवीमुंबईत चार आणि मुंबईत दोन गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.कळवा त्रिवेणी संगम सोसायटीत राहणाऱ्या सुहासिनी विचारे यांचे घर २७ ते २८ मार्च २०२५ दरम्यान बंद होते. त्यावेळी त्यांच्या घरात चोरी झाली होती. याचदरम्यान चोरट्यांनी घरातून ५५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि ६० ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने असा एकुण ३ लाख ५१ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर ठाणे गुन्हे शाखेचे पथक तपास करत असताना, त्या दोघांची ओळख पुढे आल्यावर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली देत, चोरलेल्या मुद्देमालापैकी ३ लाख २ हजारांचा ऐवज त्यांच्याकडून हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले . तसेच वर्तकनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या २ घरफोडीच्या गुन्ह्यांची कबुली त्यांनी देत, त्या गुन्हयामध्ये चोरलेल्या मुद्देमालापैकी २ लाख १६ हजारांचे सोन्याचे दागिने आणि ८० हजारांचा निकॉन कंपनीचा कॅमेरा आणि गुन्हयात वापरलेली रिक्षा असा तिन्ही गुन्हयातील एकूण ६ लाख ९८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलिसांनी त्यांच्याकडून हस्तगत केला आहे. ही कारवाई ठाणे गुन्हे शाखा १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या पथकाने केली.

# महापालिका निवडणुका या वर्षी नाहीतर पुढच्या वर्षी



वनमंत्री गणेश नाईकांचे संकेत

**ठाणे**: -नगरसेवक, सभागृहनेते, महापौर, आमदार- नामदार या खुर्च्या आळव्याचे पाणी असते. हवेचा झोका आल्यावर ते माती जाते. तर, काही लोकांना पैशांचा माज असतो. काहींना खुर्चीचा साज असतो, तर काहींना मोठेपणा मिरवण्याची सवय असते. पण हे ही सर्व मातीत जाते. त्यामुळे माणुसकीचे जतन करा. शिवाय यावर्षी महापालिका निवडणूका होतील असे मला वाट नाही. असे प्रतिपादन राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी गुरुवारी रात्री ठाण्यात एका कार्यक्रमात बोलताना केले.ठाणे बाळकुम येथे आई एकविरा मित्र मंडळ बाळकुम यांच्या विद्यमाने ठ बाळकुम (ठाणे) ते एकविरा (कार्ला) ठ येथे आई एकविरा देवीच्या चैत्र सप्तमी यात्रे निमित्ताने आयोजित होणाऱ्या ठ मानाची बाळकुम ठाण्याची -पदयात्रा व पालखी ठ सोहळ्यास २१ वर्ष पूर्ण झाल्या निमित्ताने आयोजित सोहळ्याप्रसंगी राज्याचे वनमंत्री ,पालघर जिल्हाचे पालकमंत्री व ठाणे जिल्हा संपर्कमंत्री गणेश नाईक यांच्यासह माजी खासदार संजीव नाईक, संकल्प नाईक, मंडळाचे अध्यक्ष समीर भोईर, धनंजय सिंह, गजानन लक्ष्मण चौधरी, मेघनाथ घरात, विजय पाटील आदी उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना वनमंत्री नाईक यांनी आगामी महापालिका निवडणुकीबाबत भाकीत वर्तवले. नाईक यांनी ३५ वर्षांनी बाळकुम गावाला भेट दिली.पुढे बोलताना नाईकांनी माणुसकी जतन केली, तर त्या माणसाच्या व्यक्तिमत्वाला झळाळी येते. समीर याचे वडील मारुती भोईर हे माझे कार्यकर्ते होते. ते नेहमी प्रेशरमध्ये राहिले. पण, समीर हा बिनधास्त आहे. त्याला खरी दुनियादारी समजली आहे. असे सांगताना, नाईकांनी समीर याला ठाणे जिल्ह्याच्या स्तरावर आपल्या ताकदीने स्थान देण्याचे काम करील असा विश्वास वर्तवला आहे. तसेच तू तुझ्याबरोबर सर्व कार्यकर्त्यांना घेऊन समाजाची सेवा कर आणि प्रेम मिळव असा वडीलधारी सल्लाही यावेळी नाईकांनी दिला.

# महापालिका मुख्यालयासमोर कचरावेचक महिलांचे आंदोलन



**ठाणे** :- वागळे इस्टेट येथील सिपी तलाव कचरा हस्तांतरण स्थानकावर काही दिवसांपूर्वी झालेल्या एका अपघातानंतर तेथे कचरा वेचक महिलांना ठाणे महापालिका प्रशासनाकडून बंदी घालण्यात आली. यामुळे अनेक वर्षांपासून कचरा वेचक महिलांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे तेथे प्रवेश मिळावा यासाठी कचरा वेचक महिलांनी मंगळवारी ठाणे महापालिका मुख्यालयासमोर आंदोलन केले. ठाणे महापालिकेचे वागळे इस्टेट भागातील सी पी तलाव कचरा हस्तांतरण स्थानकावर ३१ मार्च २०२५ रोजी राजश्री जाधव या कचरा वेचक महिलेचा डम्परच्या चाकाखाली येऊन मृत्यु झाला. या महिलेच्या कुटूंबियांना भारतीय असंघटीत मजुर कामगार संघटनेने २ लाख रुपयाची तर, ठाणे महापालिकेने ५ लाखाची मदत केली होती. तसेच तिच्या मुलाला महापालिकेत कंत्राटी पद्धतीने नोकरी देण्यात आली आहे. अशी दुर्घटना पुन्हा घडू नये यासाठी पालिकेने याठिकाणी कचरावेचक महिलांना प्रवेश बंदी घातली आहे. या निर्णयाविरोधात भारतीय असंघटीत मजुर कामगार संघटनेच्या नेतृत्वाखाली कचरावेचक महिलांनी मंगळवारी तेथे प्रवेश मिळावा यासाठी
पालिका मुख्यालयासमोर आंदोलन केले. महापालिका प्रशासनाच्या निर्णयामुळे २०० महिला कचरा वेचकांचे कुटूंब उध्वस्त होईल. त्यांच्या जीवनमरणाचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. कचरा वेचक महिला पालिका प्रशासनास कचरा वर्गीकरण करण्यास मदत करीत असतात. या कचऱ्यातून अनेक पुनर्वापर वस्तु, कचरा गोळा करुन २०० कचरावेचक महिला आपली उपजिविका चालवून कुटूंबाचे पालनपोषन करतात. त्यामुळे त्यांना कचरा हस्तांतरण केंद्रावर प्रवेश देण्यात यावा, अशी मागणी कचरा वेचक महिलांनी आंदोलनादरम्यान केली.

# दोन सराईत सोनसाखळी चोरटे जेरबंद

## ईराणी गुन्हेगाराचा समावेश

**ठाणे**:- ठाणे, नवी मुंबई व मुंबई परिसरात सकाळच्या सुमारास मॉर्निंग वॉक जाणप्रया ज्येष्ठांना हेरून त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरणप्रया आंबिवली येथील जाफर युसूफ जाफरी उर्फ चव्हान (२६) या ईराणी गुन्हेगारासह त्याच्या साथीदार संदीप गिरिषचन्द्र प्रसाद (२०) अशा सराईत दुकलीला वर्तकनगर पोलिसांनी अटक केली. चौकशीत त्यांनी आठ गुन्ह्यांची कबुली दिली असून त्यामध्ये चार गुन्हे वर्तकनगरमधील असून उर्वरित चार गुन्हे हे कळवा, चितळसर, खडकपाडा आणि नवघर पोलीस ठाण्यातील आहेत. तसेच त्यांच्याकडून एकूण १५ गुन्हे उघडकीस आणण्यातही पोलिसांना यश आले. याशिवाय त्या दोघांकडून चोरीला गेलेल्या गुन्ह्यातील सोन्याचे दागिने, मोबाईल फोन आणि दोन दुचाकी असा ५ लाख २५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सद्यस्थितीत ते दोघे न्यायालयीन कोठडीत असल्याची माहिती सहायक पोलीस आयुक्त मंदार जावळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यशोधननगर येथील फिर्यादी वंदना माने या १२ मार्च रोजी तमन्ना बिल्डींगच्या पासुन आई माता चौकच्या दिशेने मॉर्निंग वॉकला जात असताना, अनोळखी चोरट्यांनी त्यांच्या गळयातील सोन्याची चैन जबरी चोरी केली. याचदरम्यान त्यांनी चोरट्यांचा हात धरून विरोध केला असता, त्या दोघांनी त्यांना ढकलुन खाली पाडले आणि जबरीने चैन खेचुन धूम ठोकली. याप्रकरणी वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्ह्याचे गांभीर्य ओळखुन वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजकुमार वाघचवरे यांच्या पथकाने ज्या ठिकाणी घटना घडली. त्या परिसराचा बारकाईने तपास केल्या. तेथुन चोरटे चितळसर, कापुरबावडी, खारेगाव टोलनाका, मुंब्रा, डायघर, मानपाडा मार्गे अंबरनाथ शहराकडे गेला असल्याची खात्री झाली. त्यानुसार सापळा रचुन त्यांना पळुन जाण्याची संधी न देता ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी त्या गुन्ह्याची कबुली दिली. तसेच त्या दोघांकडुन सदर गुन्हयातील तसेच इतर गुन्हयातील जबरी चोरी केलेला एकुण ३ लाख ९० हजार २४० रूपये किमतीचे ६ तोळे, ४ ग्रॅम, ७४ मिली ग्रॅम वजनाचे सोन्याचे चैन व मंगळसुत्र हस्तगत केले तसेच १ लाख २० हजारांच्या दोन मोटारसायकल व १५ हजारांचे दोन मोबाईल फोन असा एकुण ५ लाख २५ हजार २४० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. तसेच एकूण १४ जबरी चोरीचे तर एक शरीर विरुद्धचा गुन्हा असे एकूण १५ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहे. त्या दोघांना २ एप्रिल रोजी अटक केले असून ते न्यायालयीन कोठडीत आहे. त्यांना इतर गुन्ह्यात ताब्यात घेतले जाईल. अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त जावळे यांनी सांगितले.




वर्तकनगर पोलिसांची कामगिरी

## जनसेवकाचा जनसंवाद

## उपक्रमाचा डंका बदलापूर ते दादर पर्यन्त; नागरिक समाधानी



**ठाणे**:- 'जनसेवकाचा जनसंवाद' या उपक्रमामुळे आज अनेक ठाणेकयांच्या समस्या, अडचणी मार्गी लावण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करत आहे. एकप्रकारे समस्या निवारण केंद्र अशी ओळख या उपक्रमाची झाली आहे. या उपक्रमामुळे अनेक सामान्य नागरिकांना न्याय मिळत आहे, त्यामुळे ते समाधानी आहेत. ठाणे नव्हे तर डोंबिवली, कल्याण, दादर, अंबरनाथ, बदलापूर आदी विविध भागातून ही नागरिक समस्या घेऊन येत आहेत असे आ. केळकर यांनी बोलताना सांगितले. ठाण्याचे आमदार संजय केळकर हे दर सोमवारी आणि शुक्रवारी नागरिकांच्या समस्या निवारण करण्यासाठी भाजपाच्या खोपट कार्यालयात उपस्थित असतात. आ. केळकर यांनी आज शुक्रवारी खोपट येथील कार्यालयात शेकडो नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या. यावेळी ठाणे जिल्हा हौसिंग सोसायटी फेडरेशन चे अध्यक्ष सीताराम राणे, माजी नगरसेवक नारायण पवार, सुनेश जोशी, भाजपा ठाणे शहर जिल्हा उपाध्यक्ष महेश कदम, दीपक जाधव, दत्ता घाडगे, ओमकार चव्हाण राजेश जाधव उपस्थित होते. ठा म पा अंतर्गत अतिक्रमणे, इमारती मधील सोलर सिस्टम, वर्तकनगर येथील डेव्हलपमंन्ट विषय, रखडलेले डेव्हल्पमेन्ट, कोपरी येथील प्रसूतीगृह स्टाफ, पाणी विषय, पोलीस स्टेशन तक्रारी, विकासकाने केलेली फसवणूक, शैक्षणिक विषय, सहकार क्षेत्रातील विषय, कामगार विषय, जागा फसवणूक असे विविध विषयांवरील शुक्रवारी ५८ निवेदने प्राप्त झाली.

आ. केळकर यांनी भेटायला आलेल्या नागरिकांच्या अडचणी, समस्या ऐकून घेतल्या व निवेदने स्वीकारली. यावेळी काही समस्यांचे निराकरण त्यांनी तिथेच संबंधित अधिकाग्यांशी दूरध्वनी वरून बोलून केले.

# ठाणे महापालिका क्षेत्रात दुसऱ्या दिवशी ४२२ अनधिकृत फलकावर कारवाई

**ठाणे**:- ठाणे महापालिका क्षेत्रात अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स आणि बेकायदा फलक हटवण्याची विशेष मोहीम सलग दुसऱ्या दिवशीही राबवण्यात आली. ठिकठिकाणी लावण्यात आलेले बेकायदा फलक, होर्डिंग्ज, जाहिराती काढण्यात आले. अतिक्रमण विभाग आणि प्रभाग समिती यांच्या समन्वयाने ही कारवाई करण्यात आली. पहिल्या दिवशी सर्व प्रभाग समिती क्षेत्रांमधून एकूण ६६५ अनधिकृत फलक काढण्यात आले.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिलेल्या निर्देशानुसार अतिक्रमण विभाग आणि सहाय्यक आयुक्त यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात येत असल्याची माहिती उपायुक्त (अतिक्रमण) शंकर पाटोळे यांनी दिली.

या मोहिमेत विजेच्या खांबावर, झाडांवर, रस्त्याच्या दुभाजकांवर, रस्त्याच्या कडेला लावण्यात आलेले बॅनर्स काढण्यात येत आहेत. अनधिकृत पोस्टर्स, होर्डिंग् ?जमुळे शहराचे विद्रुपीकरण होत असून अनेकदा वाग्यामुळे अशा प्रकारचे होडिंग्ज पडून दुर्घटना होण्याची शक्यताही असते.




पोस्टर्स, बॅनर्स आणि बेकायदा फलक यांच्या विरोधात महापालिकेची विशेष मोहीम

**प्रभागसमितीनिहाय कारवाईचे आकडे**

| | |
|---|---|
| नौपाडा-कोपरी प्रभाग समिती | ६५ |
| वागळे इस्टेट प्रभाग समिती | ६८ |
| लोकमान्य-सावरकरनगर प्रभाग समिती | ५२ |
| वर्तकनगर प्रभाग समिती | १९ |
| माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती | १० |
| उथळसर प्रभाग समिती | २४ |
| कळवा प्रभाग समिती | ५० |
| मुंब्रा प्रभाग समिती | ३७ |
| दिवा प्रभाग समिती | -९७ |
| **एकूण** | **- ४२२** |

# उद्धव ठाकरे बंगालमधील हिंदुवरील अत्याचाराचा निषेध करतील का ; शिवसेना खासदार नरेश म्हस्के यांचा सवाल

## ममता बॅनर्जींचे सरकार बरखास्त करा ; बंगालमधील हिंदुवर अत्याचार होताना उबाठा गप्प का?

## शिवसेनेचे शिष्टमंडळ लवकरच पश्चिम बंगालमध्ये जाणार

**ठाणे :-** पश्चिम बंगालमधील हिंसाचारात हिंदुंची हत्या झाली असून तेथील हिंदू कुटुंबे घरदार सोडून पळून जात आहेत. मुस्लिम मतांसाठी लाचार झालेल्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे बंगालमधील सरकार बरखास्त करण्याची मागणी शिवसेनेचे खासदार व प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी आज केली.ठाण्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. हिंदुंवरील अत्याचाराबाबत उबाठा गप्प का, असा सवाल खासदार म्हस्के यांनी यावेळी केला. शिवसेनेचे शिष्टमंडळ लवकरच पश्चिम बंगालमध्ये जाणार असून तेथील पिडित हिंदु कुटुंबियांना मदत करणार असल्याचे खासदार म्हस्के म्हणाले. याचदरम्यान स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणणारे आणि मातोश्रीवर ममता बॅनर्जी यांना चहापानाला बोलावणारे उद्धव ठाकरे बंगालमधील हिंदुंवरील अत्याचाराचा निषेध करतील का असा सवाल खासदार म्हस्के यांनी उपस्थित केला आहे.

खासदार म्हस्के पुढे म्हणाले की, केंद्र सरकारने वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक मंजुर केल्यानंतर बंगालमध्ये विशिष्ट समाजाच्या लोकांनी हिंदु समाजावर हल्ले सुरु केले आहेत. मुर्शिदाबादमध्ये समाजकंटकांनी पोलीसांसमोरच हिंदू कुटुंबाच्या घरात घुसून ठार मारले. हिंदु कुटुंबियांची मालमत्तेची वाहनांची जाळपोळ करण्यात आली. तेथील मुख्यमंत्री ममता बॅनर्जी हिंदुंना संरक्षण करण्यास सपशेल अपयशी ठरल्या आहेत, त्यामुळे तेथील सरकार बरखास्त करावे, अशी मागणी केंद्र सरकारकडे करणार असल्याचे खासदार म्हस्के म्हणाले.

मुस्लिम मतांसाठी ममता बॅनर्जी लाचार झाल्या आहेत, अशी घणाघाती टीका म्हस्के यांनी केली. मुंबईवर २६/११ रोजी झालेल्य दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणाप्रमाणे ममता बॅनर्जी वागत असून त्यांचे नाव बदलून ममता राणा करावे, अशी खरमरीत टीका खासदार म्हस्के यांनी केला. ते पुढे म्हणाले की यापूर्वीही बंगालमध्ये हिंदुंवर सातत्याने अत्याचार झाले आहेत. लोकसभा निवडणूक आणि त्यापूर्वी झालेल्या पंचायत निवडणुकीत संपूर्ण बंगालमध्ये हिंसाचार झाला होता. वर्ष २०१८ मध्ये रामनवमीच्या दिवशी राणीगंज शहरात दंगल घडवण्यात आली होती. मुस्लिम तुष्टीकरणाच्या नादात ममता बॅनर्जी यांनी घटनेची मोडतोड केली आहे, असे ते म्हणाले.

काँग्रेस सरकारच्या काळात ज्या प्रकारे काश्मिरमधून हिंदु कुटुंबांना पलायन करावे लागले होते, तशाच प्रकारे आता बंगालमध्ये हिंदु कुटुंबांना आपलं घरदार सोडून पळावे लागत आहे. मात्र ममतांना घाबरुन इंडि अलायन्सचे नेते राहुल गांधी, शरद पवार, अखिलेश यादव, उद्धव ठाकरे, एम.के स्टॅलिन यांनी बंगालच्या हिंसाचारावर सोयीस्कर मौन बाळगले अशी टीका खासदार म्हस्के यांनी यावेळी केली. शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे बाळासाहेबांचे विचार पुढे नेण्याचे काम करत आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत लोकांनी खरी शिवसेना कोण पुढे नेत आहेत, यावर शिक्कामोर्तब केले. आज एआय टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून बाळासाहेबांना भाषण करायला लावताय इतकी वाईट वेळ तुमच्यावर आली, अशी घणाघाती टीका खासदार म्हस्के यांनी केली. त्यांची अवस्था खचलेले मन, खचलेला पक्ष, खचलेली वृत्ती आणि खचलेला नेता अशी झाली आहे. संजय राऊत हे जळकं लाकूड असून अधून मधून राऊत यांच्यातून धूर येत असतो, असा टोला खासदार म्हस्के यांनी लगावला.

# फेरीवाल्यांचा विळखा, प्रवाशांना धमक्या, अन्, स्वच्छतागृहातही फसवणूक!



## ठाणे रेल्वे स्थानकातील गैरसोयींकडे संजय वाघुलेंनी वेधले लक्ष

**ठाणे :-** मुंबई-ठाणे रेल्वेसेवेच्या वर्धापनदिनाच्या पार्श्वभूमीवर ठाणे रेल्वे स्थानकात प्रवाशांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी रेल्वे प्रशासनाने कारवाई करावी. रेल्वे स्थानक परिसराला फेरीवाल्यांचा पडलेला विळखा, पादचारी पूलावर फेरीवाल्यांकडून दिल्या जाणाऱ्या प्रवाशांना धमक्या आणि स्वच्छतागृहात लघुशंकेसाठीही शूल्क आकारून प्रवाशांची होणारी फसवणूक आदी दूर करण्यासाठी प्रयत्न करावी, अशी आग्रही मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी ठाणे रेल्वे स्टेशनच्या व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली. ठाणे रेल्वे स्टेशनमधून दररोज सुमारे साडेसहा लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करीत आहेत. वाढत्या प्रवाशी संख्येबरोबरच रेल्वे स्टेशनमधील अपुऱ्या सुविधांमुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. आज १६ एप्रिल रोजी मुंबई-ठाणे रेल्वेसेवेचा १७२ वा वर्धापनदिन साजरा करीत असतानाच, ठाणेकर प्रवाशांना अनेक समस्या भेडसावत आहेत, याकडे भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी रेल्वे स्टेशन व्यवस्थापक किशोत तावडे यांचे लक्ष वेधले. या वेळी भाजपाचे नौपाडा मंडल अध्यक्ष विकास घांगरेकर, हिरोज कपोते, हनुमंता शिंगे, नौपाडा मंडल महिला मोर्चा अध्यक्षा वृषाली वाघुले यांचीही उपस्थिती होती.

ठाणे रेल्वे स्टेशनच्या १५० मीटरपर्यंत परिसरात फेरीवाल्यांना बंदी असली तरी, रेल्वे प्रशासनातील काही अधिकारी व काही आरपीएफ जवानांच्या संगनमताने बेकायदा फेरीवाल्यांचा उपद्रव होत आहे. रेल्वे स्टेशनवरील पादचारी पुलांचाही ताबा फेरीवाल्यांनी घेतला असून, गर्दीच्या वेळी अडथळ्याबाबत तक्रार करणाऱ्या प्रवाशांना धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. रेल्वे स्टेशनमधील प्लॅटफॉर्मवरील स्वच्छतागृहाच्या कंत्राटाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतरही, कंत्राटदाराने ताबा सोडलेला नाही. रेल्वेच्या नियमानुसार लघुशंकेसाठी मोफत सुविधा असतानाही, प्रवाशांकडून पैसे उकळले जात आहेत. प्लॅटफॉर्म क्र. १ बाहेरील वाहनतळाच्या ठेकेदाराकडून पार्किंग इमारतीतील रॅम्पवरही दुचाकी लावल्या जात असून, सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष केले जात आहे. दुर्दैवाने एखादी दुर्घटना घडल्यास रॅम्पवरील वाहनांचा अडथळा येण्याची भीती वाटते. या समस्यांचा विळखा सोडविण्याची गरज आहे, अशी मागणी जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी केली.

# चिमुरडीवर बलात्कार करून हत्या करणाऱ्या नराधमाला कोर्टाच्या आवारातच चोप देण्याचा प्रयत्न

**ठाणे :-** दहा वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून नराधमाने तिला सहाव्या मजल्यावरून खाली फेकणारा नराधम आसिफ मन्सुरी याला राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा मर्जिया शानू पठाण आणि त्यांच्या महिला सहकाऱ्यांनी कोर्टाच्या आवारातच चोप देण्याचा प्रयत्न केला. मुंब्र्याच्या ठाकूरपाडा येथील श्रद्धा प्राप्ती अपार्टमेंट परिसरात मित्रमैत्रिणींसोबत खेळत असलेल्या दहा वर्षीय मुलीला नराधम आसिफ मन्सुरी याने खेळणी देण्याचे आमिष दाखवून घरी नेले. इमारतीच्या सहाव्या मजल्यावर राहत असलेल्या आसिफने या चिमुकलीवर जबरदस्ती अत्याचार केला आणि पुरावा नष्ट करण्यासाठी बाथरूमच्या खिडकीमधून तिला खाली फेकून दिले होते. या प्रकरणी मन्सूर याला मुंब्रा पोलिसांनी अटक केली होती. त्याची पोलीस कोठडी संपली असल्याने पोलिसांनी त्याला कोर्टात आणले. त्यावेळेस आधीच कोर्टात उपस्थित असलेल्या मर्जिया पठाण यांनी आपल्या महिला सहकाऱ्यांच्या मदतीने पोलिसांच्या ताब्यात असलेल्या मन्सूर यास चप्पलने मारहाण केली. विशेष म्हणजे, या प्रसंगी कोर्टात असलेल्या अनेक महिलांनी मर्जिया यांच्या कृतीचे कौतूक करीत नराधमाला केलेल्या मारहाणीचे उघडपणे समर्थन केले. या संदर्भात मर्जिया पठाण यांनी सांगितले की, मयत चिमुरडीची जात - धर्म शोधून त्याचे राजकारण करण्याचा प्रयत्न होत आहे. पण, माझ्या मते ती एक मुलगी होती, माझी छोटी बहिण होती. एवढेच महत्वाचे आहे. अशा पद्धतीने अत्याचार होत असतील तर नराधमांना भीती वाटेल, असे काम आपण करायला हवे. त्याच उद्देशाने या नराधमाला मी चोप दिला आहे. जर, चिमुरडीवर बलात्कार करणाऱ्या मन्सूरचा खटला जलदगती न्यायालयात चालविला नाही अन् तो जर जामिनावर सुटला तर तो दिसेल तिथे आम्ही पुन्हा प्रसाद देऊ अन् त्याची जबाबदारी ही सरकारची असेल, असा इशाराही मर्जिया पठाण यांनी दिला.

# कळव्यात एमसीएचे रजिस्ट्रेशन केंद्र सुरू




## निवड चाचणीसाठी जिल्हातून ६०० क्रिकेटपटू कळव्यात


**ठाणे** :- ठाणे जिल्ह्यातील क्रिकेट पटूंना एमसीएमध्ये नावनोंदणी करण्यासाठी थेट वानखेडे स्टेडियम गाठावे लागत होते. आता ही अडचण दूर झाली आहे. एमसीएचे सदस्य , आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या पाठपुराव्याने एमसीएचे नोंदणी केंद्र कळव्यातील खारलँड मैदानात सुरू करण्यात आले आहे. दरम्यान, या मैदानात एमसीएची निवड चाचणी सुरू असून या चाचणीसाठी सुमारे ६०० क्रिकेटपटूंनी आपली हजेरी लावली. कळवा रेल्वे स्टेशनपासून अगदी जवळ असलेल्या खारलँड मैदान हे ठाणेकर क्रिकेटपटूंची पंढरी झाले आहे. अनिरुद्ध क्रिकेट अकादमीच्या वतीने या मैदानाचे संचालन करण्यात येत असते. या मैदानात प्रशिक्षण घेणाऱ्या अनेक क्रिकेटपटूंनी एमसीएच्या अनेक स्पर्धा गाजवल्या आहेत. हे मैदान रेल्वे स्टेशनपासून जवळ असल्याने येथे निवड चाचणी घेण्यात यावी, अशी भूमिका डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी मांडली होती. त्यानंतर येथे निवड चाचणीला सुरुवात करण्यात आली आहे. सध्या एमसीएचे अधिकृत प्रतिनिधी दर्शन भोईर यांच्या मार्गदर्शनानुसार संग्राम शिर्के, नितीन पालांडे, चंद्रकांत भाटकर, कुलदीप यादव, सुशील मापुस्कर आणि समीर मांजरेकर या प्रशिक्षकांच्या उपस्थितीत १४ वर्षाखालील मुले आणि १७ वर्षाखालील मुली यांची निवड चाचणी सुरू आहे, अशी माहिती विरेश तावडे यांनी दिली.

दरम्यान, ठाणे जिल्ह्याच्या विविध भागातील क्रिकेटपटूंना एमसीएमध्ये आपली नावनोंदणी करावयाची असल्यास थेट मुंबईतील वानखेडे मैदान गाठावे लागत होते. प्रवास आणि इतर बाबींसाठी ते अडचणीचे होते. ही बाब डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या लक्षात येताच, त्यांनी एमसीएकडे पाठपुरावा करण्यास सुरूवात केली. त्यांच्या पाठपुराव्यामुळे खारलँड येथे रजिस्ट्रेशन केंद्र सुरू करण्यात आले आहे.

## दिव्यात पुन्हा मीटर रूमला आग तब्बल ९५ मीटर बॉक्स जळून खाक



**ठाणे**:- दिवा आगासन रोडवरील सावित्रीबाई फुले बिल्डिंग, बी- विंग या इमारतीच्या मीटर रूममध्ये गुरुवारी पहाटे सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास आग लागली. या आगीवर एक तासांनी नियंत्रण मिळविण्यात यश आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी तब्बल ९५ मीटर बॉक्स जळून खाक झाले आहेत. अशी माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली. दिवा,चौधरी कंपाऊंड येथील इको स्टेट टॉवरमधील मीटर रूममध्ये सोमवारी सकाळी आग लागली होती. त्यावेळी ४५ मीटर बॉक्स जळून खाक झाले होते. ही घटना ताजी असताना, गुरुवारी सकाळी या सावित्रीबाई फुले बिल्डिंग, बी- विंग या तळ अधिक ०७ मजली इमारतीच्या तळ मजल्यावरती असणाऱ्या मीटर रूममध्ये आग लागली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली. या आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविण्यात त्या विभागाला एक तासांनी यश आले. पण, या आगीत इमारतीचे ९५ मीटर बॉक्स जळून नुकसान झाले आहे. यावेळी ०१-रेस्क्यू वाहनासह ०१-फायर वाहन पाचारण करण्यात आली होती. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.



# ठाणेकरांनो, पाणी जपून वापरा, पाण्याचा अपव्यय टाळून पाणी बचत करा,महापालिकेचे नागरिकांना आवाहन

**ठाणे :** सध्या तीव्र उन्हाळा असल्याने धरणातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत आहे. तसेच विहिरी व कूपनलिकांच्या पाण्याच्या पातळीत मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. पावसाळा सुरू होईपर्यंत तीव्र पाणी टंचाई निर्माण होऊ नये यासाठी नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करुन पिण्याच्या पाण्याचा वापर गाड्या धुणे, व नळ सुरू ठेवून काम करणे टाळावे व पाण्याची बचत करावी असे आवाहन ठाणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

शक्यतो गाड्या धुवू नयेत त्या ऐवजी बोअरवेलच्या पाण्याने ओल्या कपड्याने गाड्या पुसाव्यात. अंगणात शक्यतो पाणी मारु नये, नळ सुरू ठेवून कपडे धुणे, भांडी घासणे, दाढी करणे टाळावे. घरातील नळांची गळती दुरूस्त करावी. तसेच सोसायटीतील गळकी टाकी, पाईप, व्हॉल्व्ह दुरुस्त करावेत. इमारतीच्या छतावरील टाकी ओव्हरफ्लो होणार याची दक्षता घ्यावी, अन्यथा याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा तसे आढळून आल्यास संबंधीत इमारतीचे / सोसायटीचे नळ कनेक्शन खंडीत करण्यात येईल. शक्यतो रोज आंघोळीसाठी शॉवर व बाथटबचा वापर करु नये.

स्वच्छतागृहामध्ये डुअल फ्लशचा वापर करावा. इमारतीतील जिने धुण्यासाठी पिण्याचे पाणी वापरु नये. पाण्याचा अनावश्यक साठा करु नये व साठा केलेले पाणी रोज सकाळी ओतून देण्याची सवय बंद करावी. इमारती/ सोसायटी/ संकुलांमधील तरण तलावास पिण्याचे पाणी वापरु नये व वारंवार पाणी बदलण्यात येऊ नये. शक्यतो आठवड्यातील पाच दिवस धुण्यायोग्य सगळे कपडे एकत्र करुन एकाच दिवशी धुवावेत. इतर दिवशी गरज पडल्यास दररोज लागणारे छोटे कपडे हाताने कमी पाण्यात धुवावेत. कपडे धुण्याचे मशीन आठवड्यातून एकदा किंवा अगदी आवश्यक असेल तेव्हा दोनदाच आणि ते पूर्ण क्षमतेने वापरावे असे केल्यास पाण्याची बचत व मशीनचा पुर्ण क्षमतेने वापर होण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे कपडे धुण्याचे मशीन किंवा हाताने कपडे धुवून निर्माण होणारे निरुपयोगी पाणी साठवण करुन पुढचे दोन दिवस फ्लश, बाथरुम धुणे, फरशी पुसणे, गाड्या धुणे व बगीचा आदीसाठी वापरावे.'पाणी अनमोल आहे, पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवा, पाणी वाचवा, पाण्याचा अपव्यय/ नासाडी टाळा' असे आवाहन ठाणे महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## पत्र देत राष्ट्रवादीने घेतली जनता दरबारात उडी;महापालिकेत मागितला मोफत सभागृह

**ठाणे:** ठाण्यामध्ये भाजप विरुद्ध शिवसेना जनता दरबार वरून रस्सीखेच चालू असताना, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने देखील जनता दरबारात उडी घेतली आहे. राष्ट्रवादीने महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी निवेदन देत, महापालिकेत मोफत सभागृह जनता दरबार घेण्यासाठी मिळावा अशी केली.

ठाण्यात मागील काही महिन्यापासून शिंदे सेना आणि भाजपमध्ये मतदारांपर्यंत जाण्यासाठी, जनता दरबार, जनसंवाद, आमदार आपल्या भेटीला आदी उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्यातून दोघेही एकमेकांवर चिखलफेक करतांना दिसत आहे. त्यात जनता दरबार सुरु झाल्यानंतर शिंदे सेनेच्या दोन पदाधिकाऱ्यांनी ठाण्यात मंगळवारी आणि गुरुवारी जनसंवाद उपक्रम हाती घेतला आहे. मंगळवारी आनंद आश्रम आणि गुरुवारी ठाणे महापालिकेत महापालिका कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी जनसंवाद घेतला जात आहे. पहिल्या गुरुवारी हा उपक्रम महापालिका मुख्यालयातील प्रवेशद्वाराजवळ घेण्यात आला होता. परंतु आता पहिल्या मजल्यावरील सभागृह त्यांना महापालिकेने उपलब्ध करुन दिले आहे. वास्तविक पाहता महापालिकेचे सभागृह हे भाड्याने दिले जात आहे. परंतु आता लोकप्रतिनिधी नसतांनाही शिंदे सेनेच्या पदाधिकाऱ्यांना महापालिकेतील सभागृह मोफत वापरण्यासाठी दिले जात असल्याने शरद पवार गटाने आता त्यावर आक्षेप घेतला आहे. महापालिकेच्या इमारतीत राजकीय पक्षांचे दरबार कसे चालू शकतात असा सवाल शरद पवार गटाचे अध्यक्ष सुहास देसाई यांनी उपस्थित केला आहे. त्यानुसार आता आम्हाला देखील महापालिकेतील सभागृह मोफत उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी त्यांनी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडे केली आहे.

## ठाण्यात हरणाचे दर्शन ; ट्रान्सफॉर्मर केबिनमध्ये होते अडकून,सुटकेनंतर जंगलात रवानगी

**ठाणे :** येऊर जंगलात एकाच वेळी दोन बिबट्याचे दर्शन झाले असताना, आता ठाण्याच्या घोडबंदर रोडवरील कासारवडवली,साईनगर येथील एमबीसी पार्क येथे एका हरणाचे दर्शन झाले. ट्रान्सफॉर्मर केबिनमध्ये अडकलेल्या त्याला हरणाला रेस्क्यू करण्यात वनविभागाला यश आले आहे. तसेच त्या हरणाच्या एका पायाला जखम झाल्याचे सूत्रांनी सांगितले. तसेच त्याला जंगलात मुक्त करण्यात आले आहे.

सदर पार्क हे घोडबंदर रोड परिसरातील जंगलात उभारण्यात आले आहे. जंगल असल्याने ते हरण रविवारी सायंकाळी या परिसरातील दिसून आले होते. त्यानुसार त्याचा काल शोध घेण्यात आला, पण ते मिळून आले नव्हते. सोमवारी दुपारी एमबीसी पार्कच्या ट्रान्सफॉर्मर केबिनमध्ये हरण अडकल्याची माहिती मिळताच संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभागाच्या रेस्क्यू पथकाने धाव घेतली. तसेच त्या हरणाला काही तासातच सुरक्षितरित्या रेस्क्यू करून त्या ट्रान्सफॉर्मर केबिनमधून सुटका केली. तसेच ते हरण मादी जातीचे असून त्याच्या मागील एका पायाला जखमी झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## अखेर सिंबा पाळीव श्वान परतला ; २४ तासांनी श्वान घरी,गाड्यांमधून फिरण्याचा आवडीने बसला असावा सिंबा श्वान रिक्षात

**ठाणे** : विटाव्यातील सिंबा नामक पाळीव श्वान शुक्रवारी अचानक गायब झाला. सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेजमध्ये तो सिंबा श्वान आयडीट एका रिक्षात बसून नवीमुंबईच्या दिशेने जाताना दिसत आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यावर २४ तासांनी अखेर सिंबा हा श्वान पुन्हा मूळ मालकाच्या घरी परतला आहे. ज्या रिक्षातून सिंबा जात होता. त्या रिक्षाचलकांचा श्वान देखील सिंबा याच्या सारखा दिसत असून तो काही दिवसांपासून हरवला आहे. त्यामुळे गैरसमजुतीतून तो आपलाच श्वान असल्याचे समजून ते चुकून त्याला घेऊन गेल्याचे सिंबा श्वानाचे पालनकर्ते सोहम सूर्यराव यांनी बोलताना सांगितले.

विटावा येथे राहणारे सूर्यराव हे नेहमीप्रमाणे शुक्रवारी सकाळी सिंबा या श्वानाला घेऊन पटणी या मैदानावर घेऊन गेले होते. तेथे त्या मोकळे सोडण्यात आले. याचदरम्यान सिंबा आवाज देऊन येत नाही तसेच कुठेही दिसत नाही. म्हणून सूर्यराव यांनी त्याचा शोध घेतला. पण, तो मिळून न आल्याने त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. याचदरम्यान पोलिसांच्या मदतीने तपासणी केलेल्या सीसीटीव्हीत सिंबा हा नवीमुंबईकडे एका रिक्षातून जात दिसत होता. तो व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. रात्रीभर शोध लागला नाही. मात्र सकाळी सिंबा हा पुन्हा घरी परतला. हा प्रकार त्या रिक्षातून नेणाऱ्या चालकाने सांगितला. अशी माहिती सूर्यराव यांनी दिली. तर गायब झालेला सिंबा परतल्याने सूर्यराव कुटुंबाला आनंद झाल्याचे दिसत होते.

ङ फिरण्याचा आवडीने बसला असावा सिंबा रिक्षात...

सिंबाला गाडीतून फिरण्याची खूप आवड आहे. त्यातूनच तो त्या रिक्षा बसून गेला असावा. त्याला घाटकोपर येथील रिक्षाचालकाने त्यांचाच श्वान समजून नेले. मात्र व्हायरल व्हिडिओने त्यांनी शनिवारी सकाळी सिंबा घरी आणून दिले. अशी माहिती सिंबा या श्वानेच पालककर्ते सोहम सूर्यराव यांनी बोलताना सांगितले.

## डॉ.श्रीधर देशपांडे स्मृती वासंतिक क्रिकेट स्पर्धेवर एकनाथ शिंदे क्रिकेट संघाचे वर्चस्व कायम

**ठाणे :** ठाण्याच्या सेंट्रल मैदानावर स्पोर्टिंग क्लब कमिटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ३८ व्या डॉक्टर श्रीधर देशपांडे स्मृती वासंतिक क्रिकेट स्पर्धेच्या सोमवारी झालेल्या अंतिम लढतीत एकनाथ शिंदे क्रिकेट क्लबने विजय इंदप ?केडमी क्रिकेट संघाचा ६ गडी राखून दणदणीत पराभव करत आठव्यांदा या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. या विजयामुळे एकनाथ शिंदे क्रिकेट संघाने पुन्हा एकदा ठाणे जिल्ह्यात आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.

सेंट्रल मैदान येथे खेळविण्यात आलेल्या या टी-२० स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विजय इंदप ?केडमी क्रिकेट संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. परंतु आशय पालकर (४-०-१६-३) व शशिकांत कदम (४-०-२८-४) यांच्या भेदक गोलंदाजीमुळे गारद झाला. त्यास अमित पांडे (३.३-०-२८-२) याने देखील मोलाची साथ दिली. विजय इंदप क्रिकेट ?केडमीने १८.२ षटकांत सर्व बाद ११४ धावा केल्या. मधल्या फळीतील फलंदाज अश्विन माळी याने सर्वाधिक २७ केल्या. एकनाथ शिंदे क्रिकेट संघाने ११४ धावांचा यशस्वी पाठलाग करताना धडाकेबाज फलंदाजी करीत १४ व्या षटकातच ६ गडी राखून हा सामना जिंकला. सलामीवीर आशय सरदेसाई याने ३४ चेंडूत ३४ धावा केल्या तर डावखुरा फलंदाज साहिल घोडे याने २५ चेंडूत ५२ धावा केल्या.

**सलग दहाव्यांदा क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत ....**

शिवसेनेचे माजी नगरसेवक विकास रेपाळे यांच्या मार्गदर्शनाखाली एकनाथ शिंदे क्रिकेट क्लब सलग दहाव्यांदा डॉक्टर श्रीधर देशपांडे स्मृती वासंतिक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल झालेला असून आठ वेळा त्यांनी स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले आहे. या स्पर्धेचे विजेतेपद संपादन केल्याने ठाणे जिल्ह्याच्या क्रिकेट विश्वात एकनाथ शिंदे क्रिकेट संघाने आपल्या विजयी घोडदौड सुरूच ठेवली आहे.